**<u>प्रेस नोट</u>** दिनांक २०/०६/२०१९

## मौजमजेसाठी दुचाकी वाहने चोरणारे वाहनचोर गुन्हे शाखा, युनिट-२ कडून जेरबंद

पुणे शहरात होणाऱ्या वाहनचोऱ्यांचे अनुषंगाने मा. श्री अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर यांनी सदर चोऱ्यांना प्रभावीपणे प्रतिबंध करून वाहनचोरांना पकडणेबाबत सुचना केल्या होत्या. दिनांक १९/०६/२०१९ रोजी वाहनचोरी गुन्ह्याचे अनुषंगाने युनिट-२ कडील स्टाफ हा दुचाकी गाड्यांवरून युनिट-२ हद्दीत प्रतिबंधक पेट्रोलिंग फिरत असताना फिरत फिरत १६.३० वा लडकतवाडी, ताडीवाला रोड, पुणे येथे आलो असता तेथे दोन मुले ॲक्टीव्हा गाडीवरुन येत असताना अचानक थांबुन मागे वळुन जावु लागले त्यांचा संशय आल्याने त्यांना पाठलाग करुन थोडयाच अंतरावर पकडुन त्यास त्यांचा नाव पत्ता विचारता त्यांनी आपली नावे १) नितेश किरण भालेराव वय २०, रा. स नं ३ शिंदे बिल्डींग वडगाव शेरी पुणे २) विधीसंघर्षित बालक वय १६ रा. खानरोड पुणे अशी असल्याचे सांगीतले. त्याचे ताब्यात मिळुन आलेल्या ॲक्टीव्हा गाडी नं एम एच १२ जी बी ६६२३ बाबत विचारपुस करुन कागदपत्रांची मागणी केली असता त्यांनी प्रथम उडवाउडवीची व असमाधान कारक उत्तरे देवुन गाडीचे कागदपत्र नसल्याचे सांगीतले. त्यांना अधिक विश्वासात घेवुन विचारपुस करता त्यांनी सदर गाडी पुणे स्टेशन एस टी स्टॅन्ड शेजारील पार्कींग मधुन सुमारे १५ दिवसापुर्वी चोरल्याचे सांगीतले. सदर गाडीचा आर टी ओ नंबर आमचे कडील मोबाईल वरील ॲप वर टाकुन पाहिला असता सदरची गाडी हि कैलास गोपीराम गुप्ता रा आझाद चौक, लोहगाव, पुणे यांचे नावावर असल्याचे दिसुन आले. सदर पत्यावर कर्मचारी पाठवुन खात्री केली असता गुप्ता यांनी वरील नंबरची त्यांची ॲक्टीव्हा गाडी दि.०३/०६/२०१९ रोजी १६.३० ते १७.१५ वाचे दरम्यान पुणे स्टेशन एस टी स्टॅन्ड शेजारील पार्कींग मधुन चोरीस गेल्याचे सांगीतले. त्यांनी समक्ष येवुन गाडी पाहुन व ओळखुन ती त्यांचीच असल्याचे सांगुन वरील दोन मुलांच्या विरुध्द बंडगार्डन पोलीस ठाणेस गुन्हा नोंद करणेत आलेला आहे. त्यात आरोपी क्र ०१ यास अटक करणेत आलेली असून, विधीसंघर्षित बालकाकडे केले तपासात त्याने मौजमजेसाठी गाड्या चोरल्याचे सांगून आणखी ०३ गाड्या सोडून दिलेले ठिकाण दाखविले असता सदरपैकी २ गाड्या कोथरूड परिसरातील व एक गाडी वानवडी भागातील असल्याचे निषपण्ण झाले आहे व त्या अनुषंगाने कोथरूड पोलीस ठाणेत ०२ गुन्हे दाखल करणेत आलेले आहेत, तसेच वानवडी पोलीस ठाणेस गुन्हा दाखल असल्याचे निषपण्ण होवून तो उघडीकस आलेला आहे. येणेप्रमाणे विधीसंघर्षित बालक व त्याचे साथीदाराकडून **किं रु. ६५,०००/- च्या दुचाकी ( ॲक्टीवा, सुझूकी एक्सेस, बजाज प्लॅटिना, बजाज डिस्कव्हर** ) जप्त करणेत आलेल्या आहेत व खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

1. **बंडगार्डन पोलीस ठाणे गुरनं २५६/२०१९ भादंवि सं कलम ३७९,३४**
2. **कोथरूड पोलीस ठाणे गुरनं २०५/२०१९ भादंवि सं कलम ३७९**
3. **कोथरूड पोलीस ठाणे गुरनं २०६/२०१९ भादंवि सं कलम ३७९**
4. **वानवडी पोलीस ठाणे गुरनं २७८/२०१९ भादंवि सं कलम ३७९**

येणेप्रमाणे वरील गुन्हे उघडकीस आणलेले आहेत.

सदरची कामगिरी ही मा. श्री अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर, मा. श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, पुणे शहर, मा. श्री. समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट-२ चे इंचार्ज पोलीस निरीक्षक, श्री. गजानन पवार, सपोनि श्री जयवंत जाधव, सपोफौ श्री अनिल ऊसुलकर, संजय दळवी, यशवंत आंब्रे, पो हवा अजय खराडे, पो ना उत्तम तारू, किशोर वग्गू पो शि कादिर शेख, दाऊद सैय्यद यांनी केलेली आहे.